स्वर्गीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने स्मृतीवन व स्मारक औरंगाबाद येथे उभारण्यासाठी निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण-२०१६/प्र.क्र.४३४/नवि-२०
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २२ फेब्रुवारी, २०१९.

वाचा:- (१) शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. संकिर्ण-२२०१५/प्र.क्र२८८/नवि-२०, दिनांक ०४.०१.२०१६.

(२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ्-३, दिनांक ०२.०४.२०१८.

(३) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.संकिण्र-२०१६/प्र.क्र ४३४/नवि-२०, दिनांक २९.०३.२०१७.

प्रस्तावना:-

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने स्मृतीवन व स्मारक उभारण्यासाठी शासन निर्णय समक्रमांक दिनांक २९.०३.२०१७ अन्वये काही अटी शर्तीच्या अधिन राहून रु. ५,००,००,०००/- (रु. पाच कोटी फक्त) इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

शासन निर्णय:-

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने स्मृतीवन व स्मारक उभारण्यासाठी रु. ५०,००, ०००/-(पन्नास लक्ष फक्त) निधी वितरीत करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

०१. उपरोक्त दिनांक २९ मार्च, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार विहित अटी व शर्तीनुसार कार्यवाही करावी.

०२. दिनांक ३१ मार्च, २०१९ अखेर ही निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०१८-२०१९ करीता वितरीत करण्यात येणाऱ्या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे. सदरची उपयोगिता प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करुन खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

०३. या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या एकुण रक्कम रुपये ५०,००,०००/- (रुपये- पन्नास लक्ष फक्त) चे कार्यान्वयन यंत्रणेस वितरण करण्यासाठी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना नियंत्रण अधिकारी तसेच जिल्हा प्रशासन अधिकारी, औरंगाबाद यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदरचा निधी आहरीत करुन कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत करावा.

०४. यासंबंधीचा खर्च मागणी क्र.एफ-२, मुख्य लेखाशिर्ष २२१७, नगर विकास, ८०, सर्वसाधारण, १९१, महानगरपालिकांना सहाय्य, (००) (८३) नागरी भागात स्मारके उभारण्यासाठी महानगरपालिकांना सहाय्यक अनुदान, ३१, सहाय्यक अनुदान (वेतनेतर), (२२१७ A०३८) या लेखाशिर्षाखाली सदर लेखाशिर्षांतर्गत सन २०१८-१९ करिता रुपये मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीमधून भागविण्यात यावा.

०५. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३ दिनांक २ एप्रिल, २०१८ नुसार विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार सदरचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

०६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०२२७१६५३४९४९२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Shankar Trambak Jadhav
Date: 2019.02.27 16:56:52 +05'30'

(शंकर जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई,
२) सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य
३) मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव
४) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) मा. राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय
७) मा. मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक
८) मा. लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय
९) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी
१०) जिल्हाधिकारी, औरंगाबाद
११) आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका
१२) महालेखापाल, महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर
१३) जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद
१४) जिल्हा प्रशासन अधिकारी, औरंगाबाद
१५) वित्त विभाग, व्यय-३ / कोषा प्रशासन-५ / अर्थसं-१६ / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) अवर सचिव (नवि-४), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) कक्ष अधिकारी (नवि-२४), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदरचा शासन निर्णय विभागाच्या नागरीकांची सनद वर प्रसिध्द करण्यात यावा.
१९) निवडनस्ती (नवि-२०)